ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

ENGLISH PART - III / MARATHI

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN - 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF ENGLISH PART - III


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Review; Potential Drugs and Remedies for the Treatment of COVID-19<br>**Mr. Sunil Pandurang Gawali** | 1-11 |
| 2 | National Policy on Disaster Management with the Context of 'Covid 19': Basic Legal Aspects<br>**Dr. Suresh G. Santani** | 12-17 |
| 3 | Welcoming the New Future after Covid-19: "The New Normal"<br>**Dr. Nilima Rajaram Mirajkar** | 18-23 |
| 4 | The Role of Telegram Groups in Teaching Learning Process and Administration Related Communication of HEIs<br>**Dr. Ghegade Shantilal Indrabhan** | 24-28 |
| 5 | Use of ICT Based Google Classroom for Effective Language Teaching<br>**Dr. Kalyan D Sonawane** | 29-34 |
| 6 | Role of Primary Health Centres Services in Covid19 with Special Reference to South Raigad District<br>**Mr. Sanjay Jagannath Kasabe** | 35-42 |
| 7 | Effect of COVID -19 Pandemic on Academic Library Services<br>**Anant Marotrao Thorat**<br>**Dr. Vilas P. Ubhad** | 43-47 |
| 8 | Impact of Covid -19 on Cashew Management at Konkan - With Special Reference to Ratnagiri and Sindhudurg Region<br>**Prof. Satish S. Kadam** | 48-58 |
| 9 | Study of Physical and Optical Properties of Pure ZnO and Cd Doped ZnO Nanostructures and Antibaterial Activities<br>**R. S. Shaikh** | 59-73 |
| 10 | Covid19 Pandemic and Indian Health Service<br>**S. V. Rankhamb** | 74-77 |
| 11 | Importance of Yoga in a Stress Management<br>**Mr. Waman Ramrao Kakade** | 78-81 |

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | कोविड-१९ आणि त्याचा भारतातील विविध क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास<br>**प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे** | ६३-६८ |
| १४ | कोविड-१९ चे भारतीय शेतीवरील परिणाम<br>**श्री. सुकुमार दत्ता पाटील** | ६९-७४ |
| १५ | कोविड १९ या आजाराचे ग्रामीण लोकांच्या मानसिक आर्थिकतेवर आणि शारीरिक दिनचर्येवर होणारा परिणाम<br>**क्षीरसागर अस्मिता विश्वास** | ७५-७९ |
| १६ | कोविड-१९ च्या दरम्यान स्थलांतरित कामगारांचे प्रश्न व अडचणी<br>**डॉ. भानुदास धोंडीबा शिंदे** | ८०-८४ |
| १७ | प्रवासी श्रमिकों की वेदना-पीड़ा दर्शाती डॉ. हुबनाथ पाण्डेय की कविता<br>**डॉ. संगीता सूर्यकांत चित्रकोटी** | ८५-९० |

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
**AJANTA - ISSN - 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)** CC-4

# १३. कोविड-१९ आणि त्याचा भारतातील विविध क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास

**प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे**
डॉ. सी. डी. देशमुख कॉमर्स व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा, जि. रायगड.

**गोषवारा**

आरोग्याच्या दृष्टीने कोरोनाकडे लक्ष देणे महत्वपूर्ण असले तरी कोरोना वायरसचे प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम हे अतिशय तीव्र स्वरूपाचे आहेत. या आजारामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम हे राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर दिसत आहेत. कोरोनाचे भारतातील विविध क्षेत्रावर जे विपरीत परिणाम झाले आहेत. याचे विवेचन सदरील शोध निबंधात केलेले आहे.

**प्रस्तावना**

कोविड-19 हा आजमितीस परवलीचा शब्द झाला आहे. ज्याने मानवजातीचे दैनंदिन जीवन अडचणीत आणले आहे. जगभरात आजपर्यंत अनेक संसर्गजन्य आजार आले परंतु ते कोविड-19 इतके प्रभावी नव्हते. कोविड-19 ने अनेक देशाची नाहीतर जागतिक अर्थव्यवस्थाच प्रभावीत नव्हे तर खिळखिळी केली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा कोविड-19 या संसर्गजन्य आजाराचे मूळ 2019 नोव्हेंबर मध्ये चीनच्या वुहानप्रांतामध्ये सापडते, त्यानंतर अल्पावधीतच या विषाणूने चीनसह संपूर्ण जगाला विळखा घातला आहे आणि कोटयावधी लोकांना हा संसर्ग झाला. म्हणून आज चीन, अमेरिका, संपुर्ण युरोपासह जगातील जवळजवळ सर्वच देश प्रभावित झाले आहेत असे दिसते. कोविड-19 याची उत्पत्ती, प्रभाव, फैलाव, लक्षणे आणि बचावाच्या पध्दती यावरून सर्वत्र चर्चा आणि वादविवाद आहेत. या गोंधळामुळे सामान्य जनता मात्र रोजच्या व्यवहारात गोंधळलेली आणि धास्तावलेलीच अधिक दिसते.

वास्तविक कोविड-19 म्हणजे कोरोना वायरस हा नवा नाही. आपणास लक्षात असेल की काही वर्षापूर्वी आलेला सार्स रोगही कोरोनाचाच एक प्रकार होता. मात्र कोविड-19 नावाच्या या नव्या विषाणूने संपूर्ण जगावर आपला प्रभाव पाडला आहे आणि कोविड-19 पासून लोक लस न घेताही बरे झाले असले तरी, ही प्रक्रिया एक भयानक स्वप्न बनवित आहे, ज्यांना बरे केले त्यापैकी काही लोकांना पुन्हा विषाणूची पूर्वस्थिती उद्धवल्यासारखे कोविड-19 ची लक्षणे दिसून आली आहेत. कोविड-19 च्या या नवीन दृश्यामुळे लोकांना कोविड-19 मधून बरे झाल्यानंतरही ते सुरक्षित नसल्यामुळे संक्रमणास बळी पडले आहे. 2019 च्या डिसेंबर आणि 2020 च्या जानेवारी मध्ये अमेरिका, संपुर्ण युरोपासह जगातील अनेक देशात कोरोनाची दुसरी लाट आली आहे. याचा विपरीत परिणाम जगातील सर्वच देशाच्या अर्थव्यवस्था कोडमोडल्या आहेत.